# डॉ. एल. डी. बलखंडे कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स पवनी, जिल्हा भंडारा

## क्रीडा विभाग वार्षिक अहवाल 2022 23

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा क्रीडा क्षेत्रात सहभाग असावा व त्यादवारे त्यांचे क्रीडा नैपुण्य क्रीडाभिरूची वाढावी यासाठी महाविद्यालयामार्फत २९/०८/२०२३ राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्यात आला. राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त आत्मरक्षण कार्यशाळाचे आयोजन करण्यात आले. प्रमुख मार्गदर्शक विशाल मांदाडे व सिमरन वाट यांनी विविध क्रीडा बद्दल माहिती सांगितली. मुलींना कराटे यांच्या स्टेप सांगून स्वतःचे रक्षण कसे करायचे हे सांगितले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी उपप्राचार्य एन.पी.शिंगाडे यांनी विद्यार्थ्यांना आत्मरक्षणाची आवश्यकता व महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.रमेश बनसोड सर यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात मेजर ध्यानचंद व खशाबा जाधव यांच्या बद्दल माहिती सांगितली. कार्यक्रमाचे संचालन प्रा.वीलास मेश्राम व कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. सोमेश्वर चोपकर यांनी केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ अंतर्गत क्रीडा स्पर्धा २०२३-२४ विद्यार्थ्यांनी आंतर विद्यापीठ स्पर्धामध्ये सहभाग घेतला. खेळाडूंनी आपले कौशल्य दाखवत अथलेटिक, जुडो ,कराटे, कबड्डी,क्रॉस,कंट्री या खेळांमध्ये सहभाग घेतला.

- **ॲथलेटिक्स**

27 ते 30 ऑक्टोबर 2023 ला आयोजित स्पर्धामध्ये विद्यार्थी सहभागी झाले

(१) कु. करिष्मा काटेखाये 400 मीटर आणि गोळा

(२) कु. तेजस्विनी सेलोकर 100 मीटर

(३) कु.अंकिता भोले 100 मीटर

(४) रमण जांभुळकर 400 मीटर

(५) पियुष आंबे डारे 100 मीटर

- **जुडो**

30 ऑक्टोबर ते ०१ नोव्हेंबर 2023 ला आयोजित स्पर्धामध्ये सहभागी विद्यार्थी

(१) योगेश उमेश शहाणे बीकॉम भाग एक

विद्यापीठ स्तरीय जुडो स्पर्धा ज्योतिबा शारीरिक शिक्षण महाविद्यालय नागपूर येथे पार पडली यात ६० किलोग्रॅम वयोगटांमध्ये प्रथम क्रमांक पटकावत छत्रपती शाहू महाराज विश्व विद्यापीठ कानपूर ऑल इंडिया इंटर झोन इंटर युनिव्हर्सिटी जुडो चॅम्पियनशिप २०२३-२४ साठी निवड झाली.

- **कबड्डी**

३ नोव्हेंबर २०२३ ला आंतर महाविद्यालयीन कबड्डी स्पर्धा महिला २०२३-२४झोन जी जे. एम. पटेल कॉलेज भंडारा येथे आयोजित करण्यात आली. विद्यार्थिनींनी सुरुवातीचे सामने जिंकून सेमी फायनल मध्ये पोहोचले यात एस. जी. बी. महिला महाविद्यालय विरुद्ध डॉ.एल.डी.बलखंडे कॉलेज पवनी असा सामना रंगला यात डॉक्टर एल. डी. बलखंडे कॉलेज पवनी महिला टीमचा पराभव झाला.

- **क्रॉस कंट्री**

3 डिसेंबर 2023 अंतर महाविद्यालय क्रॉस कंट्री पुरुष स्पर्धा 2023 24 या स्पर्धामध्ये श्रीकृष्ण युवराज मेश्राम बीए भाग २ याने सहभाग घेतला होता

- **कराटे**

सात ते नऊ डिसेंबर 2023 ला आयोजित स्पर्धामध्ये सहभागी विद्यार्थी

(१) कु.आचल मुकेश बोकडे

(२) नंदू ज्ञानेश्वर लिचडे

विद्यापीठ स्तरीय कराटे स्पर्धा 2023 24 मध्ये आचल मुकेश बोकडे - 45 kg गटामध्ये प्रथम क्रमांक पटकावत राष्ट्रीय स्तरावर साउथ झोन इंटर युनिव्हर्सिटी कराटे चॅम्पियनशिप भोपाळ 2023 24 निवड करण्यात आली

महाविद्यालयात विशेष म्हणजे क्रीडा विभाग अंतर्गत संपूर्ण दिवसभर महाविद्यालयात खेळाचे आयोजन करण्यात आले. यात कबड्डी मुले मुली खो-खो, व्हॉलीबॉल, बॅडमिंटन, अथलेटिक्स 100मीटर, 200 मीटर, 400 मीटर, गोळा फेक, लांब उडी, उंचवडी तसेच मुलींसाठी संगीत खुर्ची इत्यादी खेळांचे आयोजन करण्यात आले. शेवटी बक्षीस वितरण करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. महाविद्यालयीन स्पर्धे करिता विविध खेळत सहभाग नोंदविला जातो. क्रीडा नैपुण्य करिता विद्यार्थ्यांच्या शारीरिक मानसिक बौद्धिक विविध मार्गदर्शन उपक्रम व प्रत्यक्ष प्रयोग क्षम खेळाच्या स्पर्धा आयोजित केल्या जातात.

राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त आत्मरक्षण कार्यशाळाचे आयोजन (२९/०८/२०२३)

Pravarsen Shikshan Sanstha, Nagpur

# Dr. L.D Balkhande College of Arts and Commerce, Pauni

## Department of Sports and Physical Education



## National Sports Day

## 29th August 2023

# Invitation

**Self Defense Workshop**

**Time : 2:00 PM**

**Chairman**



Dr. Ramesh S Bansod
Principal
Dr. L.D Balkhande College of Arts and Commerce, Pauni

**Chief Guest**



Mr. Vishal Mandade
4 DAN Black Belt
Kudo Coach and Trainer

**Org. Secretary**



Nandkishor Singade
Vice Principal
Dr. L.D Balkhande College of Arts and Commerce, Pauni



Dr. Sanjay Nandagawali
IQAC Coordinator



Miss. Simran Wath
Karate Trainer

**All the staff and Students are invited to attend the workshop**




राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त आत्मरक्षण कार्यशाळाचे आयोजन (२९/०८/२०२३)






ॲथलेटिक्स

जुडो




कबड्डी






क्रॉस कंट्री

कराटे

# यश शहाणे याला ज्युडो स्पर्धेत गोल्ड मेडल

देशोन्नती वृत्तसंकलन...

**पवनी** ■ स्थानिक डॉ.एल.डी.बलखंडे कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स पवनी येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या अंतर्गत घेण्यात आलेल्या व महात्मा ज्योतिबा फुले फिजिकल एज्युकेशन महाविद्यालय नागपूर येथे झालेल्या स्पर्धेत ६० किलो वजन गटात बी.ए.प्रथम वर्षात शिकत असलेला यश शहाणे यांनी उत्तम प्रदर्शन करून गोल्ड मेडल प्राप्त केले.

याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रमेश बन्सोड, उपप्राचार्य प्रा. नंदकिशोर सिंगाडे, समन्वयक डॉ.संजय



नंदागवळी, लोकेश बतुलवार तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेत्तर कर्मचारी यांनी त्याचे अभिनंदन केले आहे.

---

देशोन्नती

# आचल बोकडे हिचे कराटे स्पर्धेत सुयश



देशोन्नती वृत्तसंकलन...

**पवनी** ■ डॉ.एल.डी.बलखंडे कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स पवनी येथील आचल बोकडे हिने विद्यापीठ स्तरीय कराटे स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून सुवर्णपदक प्राप्त केले.

भोपाल येथे दि.१५ ते २० जानेवारी दरम्यान होत असलेल्या साउथ झोन स्पर्धेकरिता तिची निवड झालेली आहे. तिच्या या निवडीबद्दल सर्वत्र कौतुक केल्या जात आहे. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रमेश बन्सोड, उपप्राचार्य प्रा. नंदकिशोर सिंगाडे, प्रा.डॉ.संजय नंदागवळी, संपूर्ण प्राध्यापक वृंद व प्राध्यापकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

Deshonnati Edition
Jan 15, 2024 Page No. 3
Powered by : eReleGo.com

---

देशोन्नती

# राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त आत्मरक्षण कार्यशाळा

देशोन्नती वृत्तसंकलन...




**पवनी** ■ डॉ.एल.डी.बलखंडे कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स पवनी येथे राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रमेश बन्सोड होते तर प्रमुख अतिथी म्हणून विशाल मांदाडे, सिमरन वाठ, उपप्राचार्य प्रा. नंदकिशोर सिंगाडे उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणामध्ये प्राचार्य डॉ. रमेश बन्सोड यांनी विद्यार्थ्यांना आत्मरक्षणाची आवश्यकता व त्याचे महत्त्व पटवून दिले तसेच मेजर ध्यानचंद आणि खाशाबा जाधव बद्दल माहिती दिली. कार्यशाळेची प्रमुख मार्गदर्शक विशाल मांदाडे यांनी प्रात्यक्षिकाच्या माध्यमाने मुलींना आत्मरक्षण करण्यासाठी कोणत्या ट्रिक आहे त्या समजावून सांगितल्या. तसेच सिमरन वाठ यांनी कराटेच्या काही स्टेप्स मुलींना आत्मरक्षणासाठी समजावून व प्रात्यक्षिकाद्वारे सांगितल्या. उपप्राचार्य प्रा.एन.पी.सिंगाडे यांनी प्रास्ताविकातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी खेळाचे महत्व पटवून दिले. कार्यक्रमाचे संचालन मराठी विभाग प्रमुख प्रा.विलास मेश्राम यांनी केले तर आभार प्रदर्शन वाणिज्य विभाग प्रमुख प्रा.सोमेश्वर चोपकर यांनी केले. कार्यक्रमाला सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Deshonnati Edition
Sep 6, 2023 Page No. 3
Powered by : eReleGo.com